# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २५/१०/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

### अवैधरीत्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे कन्हानः—** दि. २४/१०/२०२४ रोजी फिर्यादी व स्टाफ हे अवैध धंदयावर कारवाई करीता पो. स्टे कन्हान परीसरात पेट्रोलींग करीता असता मुखबिरव्दारे खबर मिळाली की यातील आरोपी नामे— सुरज शिशीर बॉल वय २० वर्ष रा. शिवाजी नगर ,पिपरी कन्हान हा अशोक नगर येथे चाकु घेउन फिरत आहे. त्यावरून फिर्यादी व स्टाफ हे घटनास्थळी गेले असता सदर आरोपी याची अंगझाडती घेतली असता कोणतेही शस्त्र मिळुन आले नाही. यास विश्वासात घेउन शस्त्राबाबत विचारपुस केली असता आरोपीने तो बसलेल्या ठिकानावरून एका दगडा खालुन धारदार लोखंडी पात्याचा चाकु लाकडी मुठ असलेला ज्याची लांबी १५ इंच, पात्याची लांबी १० इंच व रूंदी १.५ इंच कि. २०० रूपयाचा मिळुन आल्याने सदर आरोपीने परवाना बाबत विचारले असता परवाना नसल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी सपोनि राहुल धर्मसिंग चव्हान रा. पो. स्टे कन्हान यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे आरोपीविरूद्ध कलम ४, २५ आर्म ॲक्ट सह १३५ म.पो. अधि. १९५१अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग विभाग श्री. राजेंद्र पाटील यांचे मार्गदर्शनात पोस्टे कन्हान येथील अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली.

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### वाहनासह एकुण ८५,४८,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २४/१०/२०२४ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय रामटेक येथील स्टाफ पोस्टे रामटेक हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, शिवनी भोंडकी, रामटेक येथे अवैधरित्या विनापरवाना रेती (वाळू) लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून शिवनी भोंडकी, रामटेक येथे नाकाबंदी करून (१) टाटा कंपनीचा १२ चाकी ट्रक क्र. एम.एच.४० सी.टी ५२०० चे डाल्यामध्ये अंदाजे ८ ब्रास रेती एकुण किंमती २४,०००रू चा माल आणि ट्रक क्र. एम.एच.४० सी.टी ५२००ची किंमती ४५,००,०००रू असा एकूण किंमती ४५,२४,०००रू चा माल आरोपी नामे १) प्रणय नामदेवजी उरकूडे वय २५ रा.डोंगरगाव ता. कूही जि.नागपूर याचे ताब्यातून जप्त केला. तसेच(२) महिंद्रा कंपनिचा १२ चाकी ट्रक क्र. एम.एच.४०बी.एफ.७९१७ असलेला चे डाल्यामध्ये अंदाजे ८ ब्रास रेती एकुण किंमती २४,०००रू चा माल आणि ट्रक क्र. एम.एच.४०बी.एफ.७९१७ ची

किंमती ४०,००,०००रू असा एकूण किंमती ४०,२४,०००रू चा माल आरोपी नामे २) शेषराव दिलीपजी ढोमणे वय २८ वर्ष रा. रेंगातूर कूही जि.नागपूर याचे ताब्यातून जप्त केला यातील दोन्ही ट्रकचे चालकाने त्यांचे मालक नामे— प्रफुल हाते, वय २९ वर्ष, रा. नवेगाव ता. उमरेड याचे सांगण्यावरून गाव केडवा जि.गोंदिया येथे असलेल्या रेती/वाळूच्या स्टाक मधून एकूण १६ ब्रास रेती एकुण किंमती ४८,०००रू चा माल आणि दोन्ही ट्रक एकूण किंमती ८५,००,०००रू असे वाळूसह एकूण किंमती ८५,४८,०००रू चा माल जप्त केला. आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं ४८(७),४८(८) म.ज.म.अधि. ४, २१ खाण खणिज अधि ,३ सा.सं.नु. प्रतीबंधक अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. १ व २, ३ अटक केली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक कार्यालय येथील पोहवा नितेश पिपरोदे, पोना अनिल सपाटे, पोअं सचिन गेडाम यांनी केली.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## वाहनासह एकुण १५,२५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २५/१०/२०२४ रोजी पोलीस स्टेशन बेला येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा चिंमनाझरी येथे ट्रक वाहनाचा चालक हा वाहनात अवैधरित्या विनापरवाना रेती (वाळू) वाहनामध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा चिमनाझरी ट्रक क्र. डभ ४० ाज १४३५ हा समोरून येतांनी दिसला. ट्रकला थांबवुन ट्रक चालकास ट्रकमध्ये काय आहे असे विचारले असता चालकाने ट्रकमध्ये रेती असल्याचे सांगितले. चालकास रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितले. ट्रक चा चालकाने विनापरवाना अवैध्यरित्या सिद्धी रेल्वे मार्गे नागपुर कडे जात असतांना पोलीस स्टेशन बेला हद्दीत मिळुन आल्याने ट्रक मधील ०५ ब्रास रेती काळया रंगाची किंमती २५,०००/— व ट्रक किंमती १५,००,०००/— असे एकुण १५,२५,०००/— रू. मुद्देमाल जप्त करून चालक **आरोपी १) प्रणय सुरेश लांबट वय २७ वर्षे रा. सिंन्धी (रेल्वे) वार्ड क्रं. ०७ साईमंदीर चे माघे ता. सेलु जि. वर्धा, मालक २) युवराज कारमोरे वय अंदाजे ४० वर्षे रा. कांन्द्री बसस्टॉप जवळ ता. समुन्द्रपुर जि. वर्धा** यांचेविरुद्ध पोस्टे बेला येथे कलम ३०३ (२), ४९ बि.एन.एस. सहकलम ४७ (७), ४८(८), महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ सहकलम ४, २१ खाण आणि खनिजे (विकास आणि निसमन), अधिनियम १९४७ सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकषान पासुन प्रतिबंधक अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बेला येथील ठाणेदार सपोनि चेतनसिंग चव्हान, पोहवा सत्येंद्र रंगारी, चालक पोअं. नितेश उपरे यांनी केली.

## पोस्टे पारशिवनी हद्दीतील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दिनांक २४/१०/२०२४ रोजी पोस्टे पारशिवनी येथील स्टाफ पोस्टे परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली कि, पारशिवनी हद्दीतील मौजा नवेगाव खैरी शिवारातील पेंच धरणाचे खाली कोराडी कॅनल कडून नदी कडे येणाऱ्या नाल्याचे काठावर एक इसम मोहाफुल हातभट्टी ची दारु गाळत आहे. अशा खबरे वरुन मौजा नवेगाव खैरी शिवारातील पेंच धरणाचे खाली कोराडी कॅनल कडून नदी कडे येणाऱ्या नाल्याचे काठावर मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे– अजय जयराम कुंभरे वय २४ वर्ष रा. बनेरा ता. पारशिवनी** हा दगड विटांचे चुलीवर लोखंडी ड्रम ठेवुन हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू गाळतांना दिसुन आला. आरोपीचे ताब्यातून १) काळया रंगाचे एका रबरी ट्यूब मध्ये ३० लिटर मोहाफुल दारू, १००/– रु प्रति लिटर प्रमाणे कि. ३,०००/– रु चा माल २) भट्टी वरील दोन्ही ड्रमच्या बाजूला असलेल्या पांढऱ्या रंगाचे प्लास्टिक कॅन मध्ये ४० लिटर गरम मोहाफुल दारू, १००/– रु प्रति लिटर प्रमाणे किं. ४,०००/– रु चा माल ३) जमिनीतील खड्ड्यामध्ये प्लास्टिक पॉलिथीन अंथरुण त्यामध्ये भिजत घातलेला ६.०० लिटर मोहाफुल सडवा, ३५/– रु प्रति लिटर प्रमाणे एकूण २१,०००/–रु ४) हातभट्टीच्या चुलीवर ठेवलेल्या दोन्हीं लोखंडी ड्रममधील एकून १०० लिटर मोहाफुल सडवा ३५/– रु प्रति लिटर प्रमाणे एकूण ३,५००/– रु ५) दोन लोखंडी ड्रम कि.१,०००/– रु ६) दोन जर्मन धामेले कि. २,०००/– रू. ७) दोन टीनाचे पिपे प्रत्येकी ५०/– रु प्रमाणे एकूण १००/– रु ८) मोहाफुल दारू गाळण्याची एक जर्मनची चाळणी किं. १००/– रू. ९) दोन सुती नेवार पट्टी किं.४०/– रु १०) अंदाजे एक मन जळाऊ लाकूड कि. ४००/– रु ११) दोन काळ्या रंगाची प्लास्टिक नळी एकून किं. १००/– रु १२) हाथ भट्टी वरील चुलीचे विटा असा एकूण ३५२४०/– रु चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीतांविरुद्ध पो.स्टे पारशिवनी येथे कलम ६५ (एफ), (ई), (सी) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोनि राजेशकुमार थोरात व इतर स्टाफ यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**